CMYK

काँग्रेसचे लवकरच विभाजन होणार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाकीत >>पान 2

एसटीच्या उत्पन्नवाढीसाठी 'पंचसूत्री : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक >>पान 3

मेहकर नगर परिषद निवडणूक रंगात! >>पान 4

**सुविचार**

जग बदलायचे असेल तर आधी स्वतःला बदलवा. - महात्मा गांधी

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 101 ■ शनिवार, दि. 15 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल काळाच्या पडद्याआड, कबीर सिंहमध्ये केली होती प्रसिद्ध भूमिका

आतील पान

# भाजपचा ऐतिहासिक विजय

## ९५ जागांसह बिहारमधील सर्वात मोठा पक्ष



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : बिहार विधानसभेच्या निवडणुकीत दोन टप्प्यांत झालेल्या मतदानानंतर आज मतमोजणी झाली. २४३ जागांवर ही मोजणी झाली. बहुमतासाठी १२२ चा आकडा कोण गाठणार याची देशभरात उत्सुकता होती. नितीशकुमार आणि भाजप यांची एनडीए विरुद्ध राजद व काँग्रेसची महाआघाडी यांच्यात हे सत्तेचे रणांगण प्रामुख्याने रंगले होते.**

मतदानानंतर सत्ताधारी एनडीएला बिहारी जनतेने पुन्हा संधी दिली असल्याचे दिसत आहे. बिहार विधानसभेच्या २४३ मतदारसंघांमध्ये ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यांत मतदान पार पडले. या दोन्ही टप्प्यांत मिळून २ हजार ६१६ उमेदवार रिंगणात होते. मुख्य लढत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीविरुद्ध महाआघाडी यांच्यात होती, जनसुराज हा नवा पक्ष प्रथमच निवडणुकीत उतरला होता. बिहारमध्ये आजवर झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होण्याचे प्रमाण खूप कमी वेळा दिसून आलेले आहे.

२०२५च्या बिहार विधानसभा निवडणुकीत भाग घेणारे दोन मुख्य आघाड्या म्हणजे एनडीए आणि महाआघाडी. एनडीएमध्ये भाजप आणि जनता दल (युनायटेड) सारखे प्रमुख पक्ष आहेत, तर महाआघाडीमध्ये राष्ट्रीय जनता दल (आरजेडी), काँग्रेस आणि डावे पक्ष आहेत. एनडीएमधील २४३ जागांपैकी भाजप आणि जेडीयूने प्रत्येकी १०१ जागा जिंकल्या आहेत, तर लोक जनशक्ती पार्टी (रामविलास) ने २९, हिंदुस्थानी अवाम मोर्चाने ६ आणि राष्ट्रीय लोकतांत्रिक मोर्चाने ६ जागा जिंकल्या आहेत. महाआघाडीमध्ये आरजेडी १४३ जागा, काँग्रेस ३७ जागा, विकासशील इंसान पार्टी १० आणि डावे पक्ष ५ जागा जिंकले आहेत.

बिहार विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवत ९५ जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. एनडीएला स्पष्ट बहुमत मिळालं आहे.

दुसरीकडे, महाआघाडीचा गड ढासळला असून तेजस्वी यादव मोठ्या अडचणीत आले आहेत. त्यांच्या पक्षाला अपेक्षित यश न मिळाल्याने महाआघाडी ६० जागांच्या आसपासच थांबताना दिसत आहे.

## नितीश कुमारच तेजस्वी! महिला-मुस्लीम-यादव मतटक्का निर्णायक

### राजद-काँग्रेसची धूळधाण; लालूपुत्र तेजस्वी निष्प्रभ



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ऐन मतदानाच्या तोंडावर बिहारमधील १.२ कोटी महिलांना देण्यात आलेली प्रत्येकी १० हजार रुपयांची रोजगाराभिमुख मदत, मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या मागे भारतीय जनता पक्षाने उभी केलेली संघटित ताकद, विस्कळीत विरोधी आघाडी, राष्ट्रीय जनता दलाचे मुस्लीम-यादव मतपेढीचे फसलेले गणित या घटकांमुळे बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप-संयुक्त जनता दलप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) शुक्रवारी अभूतपूर्व विजय मिळवला.

विधानसभेच्या २४३ जागांपैकी एनडीएने दोनशेहून अधिक जागांवर विजय किंवा निर्णायक आघाडी मिळवली. तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील विरोधी 'महागठबंधन'ला जेमतेम ३५ जागांवर विजय मिळवता आला. काँग्रेसला दोन आकडी जागाही मिळवता आल्या नाहीत. राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाला भोपळा फोडता आला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता आणि प्रचारातील प्रभाव पुन्हा दिसून आला. तसेच संयुक्त जनता दलाचे नेते नितीश कुमार यांची 'सुशासनबाबू' अशी प्रतिमा विजय मिळवण्यात महत्त्वाची ठरली. बिहारमधील सर्वच भागांमध्ये विरोधी पक्षीयांची पीछेहाट झाली.


या निकालाने हिंदी भाषक पट्ट्यात आपला प्रभाव कायम असल्याचे भाजपने दाखवून दिले. लोकसभा निवडणुकीनंतर हरयाणा, महाराष्ट्र आणि आता बिहार या तिन्ही राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने विरोधकांना नेस्तनाबूत केले. मात्र यासाठी एरवी रेवडी संस्कृतीचा आधार घेणे भाग पडत असल्याचेही दिसत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नितीश कुमार या दोघांनीही वर्षभरापूर्वीच रेवडी संस्कृतीची थट्टा केली होती. लालूप्रसाद यांचे पुत्र तेजस्वी यादव यांना बऱ्याच विलंबानंतर विरोधी आघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून सादर केले गेले. तोपर्यंत एनडीएने नितीश कुमार यांना मुख्यमंत्रीपदाचे भावी उमेदवार ठरवून प्रचार सुरूही केला होता. तेजस्वी निवडून आल्यास बिहारमध्ये पुन्हा जंगलराज येईल, असा प्रचार पंतप्रधानांसह अनेक नेत्यांनी केला, त्याचाही मोठा परिणाम विशेषतः महिला मतदारांवर दिसून आला.

भाजपचा मित्रपक्ष असलेल्या संयुक्त जनता दलाने गेल्या निवडणुकीच्या तुलनेत कामगिरीत लक्षणीय सुधारणा केली. याखेरीज चिराग पासवान यांच्या लोकजनशक्ती (रामविलास) तसेच हिंदुस्थानी अवाम मोर्चा (धर्मनिरपेक्ष) आणि राष्ट्रीय लोकमोर्चा या एनडीएच्या मित्रपक्षांनीही मोठे यश मिळवले. महिलांच्या मतदानाच्या संख्येत वाढ झाली. त्याचा फायदा एनडीएला झाला. सत्तेत येण्यासाठी ताकद लावलेल्या राष्ट्रीय जनता दलाला जेमतेम २५ जागा जिंकता आल्या. गेल्या निवडणुकीतील ७५ जागांवरून त्यांची ही घसरण झाली. विरोधी पक्षनेतेपदासाठी आवश्यक असलेल्या दहा टक्के जागा त्यांना जेमतेम मिळवता आल्या, यावरून त्यांचा पराभव किती दारुण हे स्पष्ट होते. तेजस्वी यादव यांना त्यांच्या राघोपूर या यादव कुटुंबीयांच्या पारंपरिक मतदारसंघात विजयासाठी झुंजावे लागले. आघाडीतील भारतीय कम्युनिस्ट पक्षाला (माले) जेमतेम दोन जागा जिंकता आल्या. भावी उपमुख्यमंत्री म्हणून घोषित केलेल्या मुकेश साहनी यांच्या विकासशील इन्सान पक्षाला एकही जागा मिळाली नाही.

> राज्यातील जनतेने आम्हाला दणदणीत विजय मिळवून देऊन आमच्यावर विश्वास दर्शवला आहे. यासाठी जनतेचे आभार मानतो. रालोआच्या घटक पक्षांमुळेही हा विजय मिळाला आहे. चिराग पासवान, जितनराम मांझी आणि उपेंद्र कुशवाह यांच्या सहाय्याने बिहार अधिक प्रगती करेल आणि देशातील सर्वात विकसित राज्यांमध्ये समाविष्ट होईल.
>
> **– नितीश कुमार, मुख्यमंत्री, बिहार**

## निवडणूक सुरुवातीपासूनच निष्पक्ष नव्हती: राहुल गाधी

**पाटणा/वृत्तसंस्था :** बिहार निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. एनडीए २४३ पैकी २०० हून अधिक जागांसह विक्रमी विजयाकडे वाटचाल करत आहे, तर महाआघाडीला ३५ जागा मिळत आहेत.



२०२० च्या तुलनेत एनडीए ७५ हून अधिक जागा मिळवत आहे, तर महाआघाडी जवळजवळ तितक्याच जागा गमावत आहे. गेल्या वेळी ४३ जागांपर्यंत मर्यादित असलेल्या जेडीयूकडे आता ८० हून अधिक जागा आहेत. भाजप ८९ जागांसह सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे. आरजेडी २४ जागांवर आघाडीवर आहे.

प्रमुख उमेदवारांपैकी तेजस्वी यादव राघोपूरमधून सुमारे १२,००० मतांनी विजयी झाले. तेजप्रताप यादव महुआमधून पराभूत झाले. त्यांच्या पक्षाने, जेजेडीने पराभवानंतर फेसबुकवर पोस्ट केली.


त्यात लिहिले आहे, तेजस्वी फेलस्वी ठरला आहे. जयचंदांनी आरजेडीचा पराभव केला आहे. मोदी हे जगातील एक मजबूत नेते आहेत. एनडीएच्या एकतेमुळे विजय झाला आहे.

महाआघाडीत, आरजेडीने २६ जागा जिंकल्या आहेत, तर काँग्रेस सहा जागा जिंकण्याच्या मार्गावर आहे. पीकेची जनसुराज पार्टी आणि व्हीआयपी यांनाही आपले खाते उघडता आले नाही. अपक्षांसह इतर तीन जागांवर आघाडीवर आहेत.

निकालांबद्दल, राहुल गांधींनी एक्स वर लिहिले, बिहारमधील हा निकाल खरोखरच धक्कादायक आहे. सुरुवातीपासूनच निष्पक्ष नसलेली निवडणूक जिंकण्यात आम्ही अपयशी ठरलो.

## बिहारच्या पराभवाची किंमत काँग्रेसला महाराष्ट्रात चुकवावी लागेल : ठाकरे आक्रमक

**मुंबई/प्रतिनिधी :** बिहार निवडणुकांचे निकाल हाती आल्यानंतर चित्र स्पष्ट होत चाललं आहे. महागठबंधनला मोठा फटका बिहार निकालात पाहायला मिळत आहे. असं असताना काँग्रेसने या चुकांमधून शिकावं, अन्यथा... ठाकरेंच्या शिवसेनेने काँग्रेसला टोला लगावत आक्रमक भूमिका घेतली आहे.



बिहारच्या निवडणुकीच्या मतमोजणीला सुरुवात झाली अन् चित्र स्पष्ट व्हायला सुरुवात झाली. आतापर्यंतच्या कलानुसार, जदूच्या एनडीए आघाडील बहुमत मिळण्याची शक्यता आहे. भाजपने यंदाच्या निवडणुकीत २४३ पैकी १०१ जागांवर उमेदवार उभे केले होते. महत्त्वाचं म्हणजे भाजप आणि जनता दल युनायटेट यांनी प्रथमच मोठ्या संख्येने जागांवर निवडणूक लढवली आहे. हा सगळा निकाल पाहता शिवसेनेचे नेते अंबादास दानवे यांनी काँग्रेसवर घणाघात केला आहे. अंबादास दानवे आपल्या पत्रकार परिषदेत म्हणाले की,काँग्रेसने मोठ्या चुका केल्या काँग्रेसने आपल्या पराभवातून शिकायला हवे, महाराष्ट्रात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री पदाची उमेदवार ठरवले असते तर परिस्थिती वेगळी असती ती चुकी बिहारमध्ये केली. भाजपने सत्तेचा गैरवापर केला आहे. तेजस्वी यादव मुख्यमंत्री पद चेहरा घोषित करायला वेळ लावला त्यामुळं खूप उशीर झाला. काँग्रेस आणि आर जे डी ने चुका केल्या एवढंच नव्हे तर मतदार यादी घोळ कायम आहेच.

## बिहार विजयाच्या पडद्यामागे विनोद तावडेंचा हात; भाजपा मोठे बक्षीस देण्याची शक्यता...

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बिहार विधानसभा निवडणुकीत NDA च्या दणदणीत यशानंतर महाराष्ट्राचे नेते विनोद तावडे यांचे नाव चर्चेत आले आहे. ओबीसी समीकरण साधण्यासोबतच उमेदवार निवडण्यात विनोद तावडेंचा मोठा हात आहे. यामुळे भाजपात त्यांना महासचिव पदापेक्षाही मोठी जबाबदारी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बिहार निवडणुकीचे प्रभारी धर्मेंद्र प्रधान आणि सह-प्रभारी विनोद तावडे हे गेल्या काही महिन्यांपासून बिहारमध्ये तळ ठोकून होते. या दोघांनी आखलेल्या आक्रमक आणि अचूक रणनीतीमुळेच भाजपने राज्यात सर्वाधिक जागा जिंकून आपले स्थान प्रबळ केले आहे. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी बिहारमध्ये पडद्यामागून महत्त्वाची भूमिका बजावली. प्रत्येक मतदारसंघातील उमेदवारांची निवड अत्यंत विचारपूर्वक केली. प्रख्यात गायिका मैथिली ठाकूर यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याचा निर्णय तावडे यांच्या रणनीतीचा भाग होता. तावडे यांच्या संघटनात्मक कौशल्याचा निवडणुकीत चांगलाच फायदा झाल्याचे राजकीय जाणकार सांगत आहेत.

राजकीय तज्ञांच्या मते, भाजप आपल्या या नव्या 'रणनीतीकाराला' मोठे बक्षीस देणार आहे. यामध्ये पक्षाचे राष्ट्रीय स्तरावरील एखादे मोठे 'पद' किंवा केंद्रातील मोठी जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे.

बिहारचा मुख्यमंत्री कोण?

NDA च्या प्रचंड विजयानंतर मुख्यमंत्रिपदावरून सुरू असलेल्या चर्चांवर भाजपचे बिहार प्रभारी विनोद तावडे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. तावडे म्हणाले, आम्ही बिहारची निवडणूक नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली लढलो, हे सत्य आहे. परंतु, मुख्यमंत्री कोण असेल, याचा निर्णय केवळ




दोन पक्ष नव्हे, तर छऊ- मधील पाचही पक्ष एकत्र बसून घेतील.

CMYK

## जननायक बिरसा मुंडा

आज १५ नोव्हेंबर, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांची जयंती. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ – ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले.एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# काँग्रेसचे लवकरच विभाजन होणार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाकीत

**दैनिक आपला विदर्भ**

नवी दिल्ली : काँग्रेस पक्षाचा अजेंडा हा मुस्लिम लीग आणि माओवादाभोवती फिरत आहे. त्यामुळे आजची काँग्रेस मुस्लिम लीग, माओवादी काँग्रेस (एमएमएस) बनली आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी काँग्रेसवर घणाघाती टीका केली. वेगळा अजेंडा असलेल्या काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा मोठी फूट पडू शकते, असे भाकीतही त्यांनी केले. बिहार विधानसभा निवडणुकीतील एनडीएच्या ऐतिहासिक विजयानंतर भाजप मुख्यालयामध्ये उपस्थितांना ते संबोधित करत होते.

यावेळी त्यांनी काँग्रेस, राजद यांच्यावर जोरदार टीका केली. तसेच ऐतिहासिक विजयाबद्दल भाजप आणि एनडीएच्या नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. बिहार जिंकल्यानंतर आता प. बंगालही जिंकणार, तेथील जंगलराजही संपविणार, अशा शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांना इशारा दिला. यावेळी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह वरिष्ठ नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज काँग्रेस एमएमसी – मुस्लिम लीग माओवादी काँग्रेस बनली आहे. काँग्रेसचा संपूर्ण अजेंडा आता याचभोवती फिरतो. म्हणूनच काँग्रेसमध्येही एक वेगळा गट उदयास येणार आहे, जो या नकारात्मक राजकारणामुळे अस्वस्थ आहे. हा गट काँग्रेसच्या नामदारांच्या विरोधात आहे. या गटामध्ये तीव्र निराशा वाढत आहे. भविष्यात काँग्रेसमध्ये आणखी एक मोठी फूट पडू शकते. काँग्रेसच्या मित्रपक्षांनाही आता हे समजत आहे की, काँग्रेस सर्वांना नकारात्मक राजकारणात बुडवत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी काँग्रेसच्या मित्रपक्षांना आधीच सांगितले आहे की, काँग्रेस हा एक परजीवी आहे. जो त्यांच्या मित्रपक्षांची व्होट बँक गिळंकृत करून पुनरागमन करू इच्छितो. म्हणून त्यांनाही काँग्रेसपासून सावध राहण्याची गरज आहे. बिहारमध्ये राजद अडचणीत आहे. काँग्रेस–राजद वाद लवकरच समोर येईल, असा दावा त्यांनी केला.

**बिहारमध्ये जंगलराज आणि कट्टा सरकार पुन्हा येणार नाही**

बिहारमध्ये जंगलराज आणि कट्टा सरकार पुन्हा येणार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. लोकांनी विकसित आणि समृद्ध बिहारसाठी मतदान केले आहे. जामिनावर असलेल्यांना जनता साथ देत नाही, हे बिहारने दाखवून दिले, असे म्हणत मोदी यांनी राष्ट्रीय जनता दलाचे नेते लालुप्रसाद यादव आणि तेजस्वी यादव यांच्यावर निशाणा साधला.



**छटी मैयाचा नारा, बिहारच्या लोकांनी गर्दा उडवला**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणाच्या सुरुवातीला छटी मैयाचा जयजयकार केला. बिहारच्या लोकांनी गर्दा उडवला, असे ते म्हणाले. या अगोदर मंचावर येताच बिहारी पद्धतीने गमछा उडवत पंतप्रधानांनी विजयाचा जल्लोष व्यक्त केला. यावेळी त्यांनी एनडीएच्या सर्व घटक पक्षांतर्फे बिहारच्या जनतेचे आभार त्यांनी मानले.

**बिहारमध्ये विजयाचा नवा 'माय' फॉर्म्युला**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, लोखंडच लोखंडाला कापते, अशी म्हण आहे. बिहारमधील काही घटक पक्षांनी एमवाय अर्थात माय (मुस्लिम आणि यादव) फॉर्म्युला बनवला होता. आजच्या विजयाने नवीन सकारात्मक एमवाय अर्थात माय फॉर्म्युला दिला. हा फॉर्म्युला म्हणजे महिला आणि युवक होय, असे ते म्हणाले.

आज फक्त एनडीएचा विजय नाही तर लोकशाहीचाही विजय झाला आहे. भारताच्या लोकशाहीवर विश्र्वास ठेवणाऱ्याचा हा विजय आहे. या निवडणुकीत निवडणूक आयोगावरील जनतेच्या विडासाला आणखी 'जबूत केले, असे पंतप्रधान म्हणाले.

**मतदार यादी सुधारणा प्रक्रियेसाठी सर्व पक्षांनी पुढाकार घ्यावा**

मतदार यादीच्या सुधारणेला युवक खूप गंभीरतेने घेतात. बिहारमध्ये युवकांनी मतदार यादी सुधारणेचे समर्थन केले. लोकशाहीच्या पावित्र्यासाठी प्रत्येक मतदाराची किंमत आणि हक्क महत्त्वाचा असतो. त्यामुळे प्रत्येक पक्षाचे दायित्व बनते की, मतदार यादी सुधारणा प्रक्रियेसाठी बूथ स्तरावर आपापल्या कार्यकर्त्यांना सक्रिय करावे. मतदार यादीच्या शुद्धीकरण प्रक्रियेमध्ये सर्व पक्षांनी योगदान द्यावे, असे आवाहन पंतप्रधानांनी केले.

# महावितरण प्रदर्शनी क्रिकेट सामन्यात मुख्यालय संघाचा रोमहर्षक विजय; नागपूर संघाचा पराभव

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी** : श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडासंकुलात सुरु असलेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रदर्शनी क्रिकेट सामन्यात बुधवारी (दि. १२) मुंबई मुख्यालय संघाने १२ षटकांमध्ये ९६ धावांचे आव्हान देत नागपूर प्रादेशिक संघाला ९० धावांवर रोखले व शेवटच्या षटकापर्यंत रंगतदार झालेल्या या सामन्यात सहा धावांनी विजय मिळवला.

महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सामना सुरू झाला. मुंबई मुख्यालयाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी स्वीकारली व खराब चेंडूवर फटकेबाजी सुरू केली आणि १२ षटकांमध्ये ६ बाद ९६ धावा केल्या. यात कार्यकारी संचालक श्री. प्रसाद रेशमे (१३ धावा), सहायक महाव्यवस्थापक श्री. वैभव थोरात (१८ धावा) व उपमहाव्यवस्थापक प्रमोद खुळे (१७ धावा) यांनी धावसंख्येला आकार दिला. तर कार्यकारी संचालक श्री. भुजंग खंदारे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके यांनीही साथ दिली. मात्र नागपूर प्रादेशिक संघाने १८ धावा अतिरिक्त दिल्याने मुख्यालय संघाची सामन्यावरील पकड मजबूत झाली.

नागपूर प्रादेशिक संघाने आव्हान स्विकारून सावध पवित्रा घेत फलंदाजी सुरू केली. यात अधीक्षक अभियंता संजय वाकडे (१८ धावा) तर कार्यकारी अभियंता श्री. प्रफुल लांडे (१५ धावा) यांनी चांगली भागिदारी करीत लक्ष्याकडे वाटचाल सुरू केली. त्यानंतर कार्यकारी अभियंता श्री. पुरूषोत्तम चव्हाण व उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मधुसूदन मराठे यांनी प्रत्येकी ११ धावा केल्या. अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. अशोक साळुंके यांनी ७ धावांचे योगदान देत संघाला विजयाकडे नेले. त्यांना चंद्रपूरचे मुख्य अभियंता श्री. हरिष गजबे व अधीक्षक अभियंता श्री. प्रविण दरोली यांनी साथ दिली. मात्र शेवटच्या षटकामध्ये विजयासाठी ११ धावांची गरज होती. मुख्यालय संघाकडून प्रमोद खुळे यांनी अचूक गोलंदाजी केली व इतरांनी उत्कृष्ट क्षेत्ररक्षण केले. त्यामुळे नागपूर प्रादेशिक संघ शेवटच्या षटकात केवळ पाच धावा करू शकला आणि मुख्यालय संघाने सहा धावांनी विजय मिळवला.

मुख्यालय संघामध्ये महाव्यवस्थापक राजेंद्र पांडे, कार्यकारी अभियंता श्री. सुनील पावरा व माणिक गवळी, वरिष्ठ व्यवस्थापक श्री. बजरंग सुर्यवंशी, उपविधी अधिकारी श्री. सुमेध कोलते तर नागपूर प्रादेशिक संघात मुख्य अभियंता श्री सुहास रंगारी (गोंदिया), श्री. दिलीप दोडके (नागपूर) व श्री. राजेश नाईक (अकोला) यांच्यासह सहायक महाव्यवस्थापक श्री. रूपेश देशमुख आदींचा समावेश होता.

## माजी मुख्यमंत्री येडियुरप्पांना हायकोर्टाचा धक्का, 'पोक्सो' प्रकरण सुरूच ठेवण्याचा आदेश

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा यांना लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण प्रकरणी आज मोठा धक्का बसला. कर्नाटक उच्च न्यायालयाने ट्रायल कोर्टाच्या (कनिष्ठ न्यायालय) आदेशाला कायम ठेवले असून, येडियुरप्पा यांच्यावर खटला चालवण्यास आणि त्यांना समन्स बजावण्यास सहमती दर्शवली आहे.

'लाईव्ह लॉ'ने दिलेल्या वृत्तानुसार, या खटल्याची सुनावणी पुढे चालू ठेवण्याची परवानगी देताना, उच्च न्यायालयाने ट्रायल कोर्टाला निर्देश दिले आहेत की, येडियुरप्पा यांची व्यक्तिशः उपस्थिती आवश्यक असल्याशिवाय त्यावर आग्रह धरू नये. आवश्यक नसताना त्यांच्या वतीने दाखल होणाऱ्या कोणत्याही सवलत अर्जाचा विचार करावा. केवळ कार्यवाहीसाठी त्यांची उपस्थिती अत्यावश्यक असेल, तेव्हाच त्यांना हजर राहण्याची सक्ती करावी.

कर्नाटक उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, ट्रायल कोर्टाने या खटल्याचा निर्णय केवळ सुनावणीदरम्यान सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारावर घ्यावा आणि याच याचिकांवरील उच्च न्यायालयाच्या निरीक्षणांचा त्यावर कोणताही प्रभाव पडू नये. याचिकाकर्त्यांना दोषमुक्तीच्या याचिकेसह सर्व परवानगीयोग्य अर्ज कनिष्ठ न्यायालयासमोर सादर करण्याची मुभा असल्याचेही आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

काय आहे प्रकरण ?

२ फेब्रुवारी २०२४ रोजी मागील लैंगिक अत्याचाराच्या आणि इतर मुद्द्यांवर न्याय मिळवून देण्यासाठी महिला आणि तिची मुलगी कर्नाटकच्या माजी मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी तक्रार ऐकताना येडियुरप्पा यांनी मुलीचा विनयभंग केला, असा आरोप मुलीच्या आईन केला होता. याप्रकरणी बीएस येडियुरप्पा यांच्यावर गुन्हाही दाखल झाला. यानंतर काही महिन्यांनी तक्रार करणार्या आईचा आरोग्याच्या समस्यांमुळे मृत्यू झाला.

# दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणात मोठी कारवाई, आरोपी डॉक्टर उमरचे पुलवामातील घर सुरक्षा दलांनी उडवले!

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ कार बॉम्बस्फोट घडवणारा दहशतवादी डॉ. उमर मोहम्मद याचे पुलवामा येथील घर सुरक्षा यंत्रणांनी आयईडीने उडवून दिले आहे. दहशतवादाविरुद्धच्या कारवाईचा एक भाग म्हणून, सुरक्षा दलांनी परिसराला वेढा घातला आणि संपूर्ण कारवाई नियंत्रित पद्धतीने पार पाडली.



या स्फोटाच्या तपासात अनेक महत्त्वाचे खुलासे झाले आहेत. गुरुवारी फरीदाबादमधील अल–फलाह विद्यापीठाच्या पार्किंगमध्ये या स्फोटाशी संबंधित आणखी एक कार आढळली. पोलिसांच्या माहितीनुसार, ही कार डॉ. शाहीन शाहिद यांच्या नावावर नोंदणीकृत आहे, त्याला व्हाइट कॉलर टेरर मॉड्यूल प्रकरणात आधीच अटक करण्यात आली आहे. फरीदाबाद पोलिसांनी सांगितले की, जम्मू आणि काश्मीर पोलिस विद्यापीठात सापडलेल्या संशयास्पद मारुती ब्रेझा कारची चौकशी करत आहेत. संशयास्पद कार आढळल्यानंतर, बॉम्ब शोध पथकाला वाहनाची तपासणी करण्यासाठी पाचारण करण्यात आले. विद्यापीठ कॅम्पसमध्ये पार्क केलेल्या इतर वाहनांची देखील तपासणी केली जात आहे आणि त्यांच्या मालकांची माहिती पडताळली जात आहे.

तपासातून असे दिसून आले आहे की, स्फोटातील मुख्य आरोपी डॉ. उमर मोहम्मद, डॉ. मुझम्मिल अहमद आणि डॉ. शाहीन शाहिदने एन्क्रिप्टेड स्विस मेसेजिंग ॲप वापरून दहशतवादी मोहिमेचे नियोजन आणि समन्वय साधला होता. स्फोटस्थळावरून मिळालेल्या डीएनए नमुन्यांवरून लाल किल्ल्याजवळ स्फोट झालेली पांढऱ्या रंगाची हुंडई आय–२० कार डॉ. उमर चालवत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

गुरुवारी हरियाणातील नुह येथेही छापे टाकण्यात आले, जिथे पिनांगवा येथील एका खत आणि बियाणे विक्रेत्याला ताब्यात घेण्यात आले. आरोपींनी या दुकानातून मोठ्या प्रमाणात एनपीके खत खरेदी केल्याचा संशय आहे. शिवाय, बुधवारी, तपास पथकाने फरिदाबादच्या खंडावली गावात मॉड्यूलची दुसरी कार लाल रंगाची फोर्ड इकोस्पोर्ट जप्त केली. फरिदाबाद पोलिसांनी ही कार गावात पार्क करणाऱ्या व्यक्तीला अटक केली आणि ती दिल्ली पोलिसांच्या ताब्यात दिली. तपासात असे दिसून आले की, दहशतवाद्यांनी आयईडी वाहतूक करण्यासाठी तीन कार खरेदी केल्या होत्या. परिणामी, दिल्ली पोलिसांनी शहरातील सर्व पोलीस स्टेशन, चौक्या आणि सीमावर्ती भागात अलर्ट जारी केला आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### आयपीएल लिलावाआधीच मुंबई इंडियन्समध्ये मोठे उलटफेर!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** आयपीएल २०२६ साठी सगळ्या १० टीमनी त्यांच्या तयारीला सुरूवात केली आहे, पण मुंबई इंडियन्सने या सगळ्यात आघाडी घेतली आहे. १५ नोव्हेंबरला सर्व टीमना त्यांनी रिलीज आणि रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करावी लागणार आहे, पण त्याआधीच मुंबईने दोन खेळाडू ट्रेड केले आहेत. मुंबईने लखनऊकडून शार्दुल ठाकूरला २ कोटी रुपयांना तर गुजरातकडून शरफेन रदरफोर्डला २.६ कोटी रुपयांना टीममध्ये घेतलं आहे. तर दुसरीकडे मुंबईने अर्जुन तेंडुलकरला लखनऊला दिलं आहे. अर्जुनला मुंबईने लिलावात ३० लाख रुपयांमध्ये विकत घेतलं होतं. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मुंबईचा मागच्या मोसमात क्वालिफायर-२ मध्ये पराभव झाला होता. सर्वाधिक ५ वेळा आयपीएल चॅम्पियन असलेल्या म ुंबईला २०२० नंतर एकही ट्रॉफी जिंकता आलेली नाही. रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या, तिलक वर्मा, जसप्रीत बुमराह एवढे स्टार खेळाडू असूनही मुंबई इंडियन्सना मागच्या काही मोसमात संघर्ष करावा लागला आहे, त्यामुळे या मोसमाआधी मुंबई टीममध्ये मोठे बदल करण्याची शक्यता आहे. आयपीएल २०२६ चा लिलाव डिसेंबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. याआधी १५ नोव्हेंबरला सर्व टीमना त्यांनी रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करावी लागणार आहे.

### वानखेडेवरून मारलेला सिक्स, आता अरबी समुद्रात जाणार...

**मुंबई/प्रतिनिधी :** आयपीएल २०२६ साठीची ट्रेड डील १५ नोव्हेंबरपर्यत करायची आहे. १५ नोव्हेंबरला संध्याकाळी ५ वाजता प्रत्येक टीमला त्यांनी रिटेन, रिलीज आणि ट्रेड केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करावी लागणार आहे, पण याच्या ४८ तास आधीच मुंबईने धमाका केला आहे. आधी शार्दुल ठाकूरला लखनऊकडून घेतल्यानंतर आता मुंबईने वेस्ट इंडिजच्या धमाकेदार फिनिशरलाही गुजरातकडून घेतलं आहे.

गुजरात टायटन्सचा आक्रमक फिनिशर शरफेन रदरफोर्डला मुंबईने २.६ कोटी रुपयांमध्ये ट्रेड करून विकत घेतलं आहे. वेस्ट इंडिजचा डावखुरा आक्रमक बॅटर असलेल्या शरफेन रदरफोर्डचं मुंबई इंडियन्समध्ये कमबॅक झालं आहे, याआधी रदरफोर्ड २०२० साली ट्रॉफी जिंकलेल्या मुंबई इंडियन्सचा भाग होता. फिनिशरशिवाय शरफेन रदरफोर्ड मीडियम फास्ट बॉलिंगही करतो. आयपीएलच्या मागच्या मोसमात मुंबई इंडियन्सकडे नमन धीरशिवाय कोणताही फिनिशर नव्हता, त्यामुळे ही कमी पूर्ण करण्यासाठी मुंबईने रदरफोर्डची टीममध्ये निवड केली आहे. मागच्या काही काळापासून मुंबई कायरन पोलार्डचा पर्याय शोधत आहे, त्यामुळे रदरफोर्ड पोलार्डची जागा भरून काढणार का? हे येणाऱ्या मोसमात स्पष्ट होईल.

शरफेन रदरफोर्डने आतापर्यंत २३ आयपीएल सामन्यांम ध्ये १३७.३८ चा स्ट्राईक रेटने ३९७ रन केले आहेत. तर वेस्ट इंडिजकडून खेळताना रदरफोर्डने १३७.३९ चा स्ट्राईक रेट आणि १८.३८ च्या सरासरीने ४४ सामन्यांमध्ये ५८८ रन केले. याशिवाय त्याने आयपीएलमध्ये ६ इनिंगम ध्ये ८.६३ च्या इकोनॉमी रेटने बॉलिंग करत एक विकेटही मिळवली आहे. टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये रदरफोर्डच्या नावावर ४ इनिंगमध्ये २ विकेट आहेत. दुसरीकडे मुंबई इंडियन्सने शार्दुल ठाकूरलाही लखनऊसोबत ट्रेड करून मुंबईमध्ये आणलं आहे. मूळचा पालघरचा असलेला शार्दुल ठाकूर हा प्रथम श्रेणी क्रिकेट मुंबईकडून खेळतो. रणजी ट्रॉफीच्या या मोसमात शार्दुल मुंबईचा कर्णधारही आहे. शार्दुलकडे वानखेडे स्टेडियमवर खेळण्याचा बराच अनुभव आहे, त्यामुळे त्याचा हा अनुभव मुंबईच्या काम ाला नक्कीच येईल.

# एसटीच्या उत्पन्नवाढीसाठी 'पंचसूत्री : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

## दैनंदिन बैठका, उद्दिष्टनिश्चिती, नव्या वेळापत्रकासह प्रवासी सेवांच्या उन्नतीचा संकल्प

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) उत्पन्नवाढ, कार्यक्षमता आणि प्रवासी सुविधांच्या उन्नतीसाठी सर्वसमावेशक 'पंचसूत्री आराखडा' तयार केला आहे. आगार पातळीपासून प्रादेशिक कार्यालयापर्यंत अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी अधिक स्पष्ट करत, सुधारणा, 'वेग' आणि 'नियमितता' या आधारे एसटी महामंडळाला पुढे नेण्याचा निर्धार केल्याचे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

मुंबई येथे एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीत बोलत होते. बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर यांच्यासह सर्व खाते प्रमुख, प्रादेशिक व्यवस्थापक व विभाग नियंत्रक उपस्थित होते.

**दैनंदिन बैठकींनी प्रशासन सज्ज**

एसटी स्वत:ला 'चल संस्था' म्हणून परिभाषित करते. दररोज लाखो प्रवाशांना सेवा देणाऱ्या या व्यवस्थेचे मूल्यमापन आणि नियोजन दैनंदिन पातळीवर व्हावे, यासाठी सकाळी १० वाजता आगारात, ११ ला विभागात आणि १२ वाजता प्रादेशिक स्तरावर आढावा बैठक अनिवार्य करण्यात आली आहे.

प्रवासी तक्रारी, रद्द फेऱ्या, नादुरुस्त वाहने, गैरहजर कर्मचारी, या सर्वांची काटेकोर छाननी करून कार्यपद्धतीत तत्काळ सुधारणा करण्याचा आदेश बैठकीत दिला.

संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत आगार, विभाग व प्रदेशस्तरावर दुसऱ्या दिवशीच्या वाहतूक आराखड्याचे नियोजन केले जाईल. यात्रांपासून बाजारपेठांपर्यंत आणि शालेय सहलींपासून आकस्मिक गर्दीपर्यंत सर्व परिस्थितीसाठी आगार सज्ज राहणार आहे.

**चालक-वाहकांसाठी स्पष्ट उद्दिष्टे – कार्यक्षमतेवर भर**

डिझेल हा एसटीच्या खर्चातील सर्वांत मोठा घटक. त्यामुळे घझढङ (किलोमीटर प्रति १० लीटर)नुसार चालकांना दररोजचे लक्ष्य दिले जाईल. घझढङ कमी असणाऱ्यांना समुपदेशन, प्रशिक्षण आणि गरजेनुसार प्रादेशिक स्तरावर उन्नत प्रशिक्षण देण्याचे नियोजन आखले गेले आहे.



तिकीट विक्री ही महसुलाची जीवन वाहिनी असल्याने वाहकांना आगाराच्या दैनंदिन उझघच् (संचित प्रति किलोमीटर उत्पन्न) प्रमाणे उत्पन्नाचे स्पष्ट उद्दिष्ट देण्यात येणार आहे. उत्पन्न कमी असल्यास समुपदेशन, कर्तव्यात बदल किंवा तोंडी/लेखी समज सर्व पर्याय वापरले जातील. सातत्याने कमी उत्पन्न करणाऱ्या वाहकांवर विशेष लक्ष दिले जाईल.

**वेळापत्रक व्यवस्थापनात सुधारणांचे वारे**

एसटीचे वेळापत्रक हा त्याच्या वाहतूक यंत्रणेचा 'आत्मा' मानला जातो. लांब पल्ल्याच्या समांतर धावणाऱ्या बसेसवरील तक्रारींची दखल घेत आता सर्व वेळापत्रकांची शास्त्रशुद्ध पुनर्मूल्यांकन प्रक्रिया सुरू केली जात आहे. मध्यवर्ती कार्यालयाची मंजुरी असलेल्या फेऱ्याच राबवाव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत.

१ जानेवारीला बसस्थानकनिहाय नवे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात येणार असून त्याची व्यापक प्रसिद्धी सोशल मीडियाद्वारे केली जाईल. वक्तशीरपणा आणि नियमितता ही एसटीची नवी ओळख बनवण्याचा संकल्प यातून स्पष्ट दिसतो.

**लांब व मध्यम लांब पल्ल्याच्या बसेसना नवे मानदंड**

आरक्षणास उपलब्ध बसची संख्या वाढवणे, भारमान ८० टक्के पेक्षा कमी न ठेवणे, चांगले भारमान असणाऱ्या दिवशी जादा फेऱ्यांची उपलब्धता, आणि प्रत्येक फेरीची देखरेख पर्यवेक्षकांच्या 'दत्तक' तत्त्वावर बस फेऱ्या देणे अशा अनेक सुधारणा लांब-मध्यम पल्ल्याच्या व्यवस्थापनात होत आहेत. यासोबतच ऑनलाइन व मोबाईल ॲपद्वारे आरक्षणाला मोठे प्रोत्साहन देण्याचा मानस आहे.

**'प्रवासी देवो भव' – सुविधांचा दर्जा उंचावणार**

स्वच्छ, टापटीप बसस्थानके, प्रसाधनगृहांची दररोज किमान तीन वेळा तपासणी, उशिरा सुटणाऱ्या किंवा रद्द बस फेऱ्यांची प्रवाशांना योग्य माहिती, पर्यायी व्यवस्था आणि अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक प्रसिद्धी अशा प्रवासी सुविधांना केंद्रस्थानी ठेवणारी उपाययोजना राबवली जाणार आहे.तक्रारींची तातडीने दखल, नोंद आणि निराकरण यावर आगार व्यवस्थापकांना विशेष भर देण्याचे निर्देश देण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. एसटीच्या आर्थिक पुनरुत्थानाच्या दिशेने ही पंचसूत्री केवळ मार्गदर्शक तत्त्वे नाहीत, तर संपूर्ण व्यवस्थेला बदलण्याचा एक ठोस आराखडा आहे. असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# बिहार निवडणुकीच्या यशाने महाराष्ट्र भाजपचा विश्वास दुणावला

## प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंनी थेट विजयाचा मॅजिक फिगर सांगितला,

**दैनिक आपला विदर्भ**

पटणा : बिहार निवडणुकांचे कल येण्यास सुरुवात झाली असून पहिल्या टप्प्यातील कलांमध्ये ऱ्ऊअ ची ताकद वाढताना दिसत आहे. परिणामी या मतमोजणीच्या अंती नीतिशकुमार की तेजस्वी यादव? बिहारचा मुख्यमंत्री कोण? याचं उत्तर आज मिळणार आहे. बिहारम धील २४३ जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत ऱ्ऊअ आणि महागठबंधन यांच्यात थेट टक्कर आहे, तर प्रशांत किशोरांच्या जन सुराज पक्षामुळे त्रिकोणी लढत रंगत आहे.



बिहारच्या निवडणुकीत झालेल्या राजकीय आरोप प्रत्यारोपांची देशभरात चांगलीच चर्चा झाली. अशातच या निवडणुकांचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणातही पडल्याचे चित्र आहे. तर बिहार निवडणुकीच्या यशाने महाराष्ट्र भाजपचा विश्वास दुणावला असून भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी या निकालावर भाष्य करत काँग्रेसवर सडकून टीका केली आहे.

बिहारच्या जनतेचे मी आभार मानतो. पंत्रप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी केलेल्या विकास कामावर म तदारांनी शिक्कामोर्तब केला आहे. विकास, विश्वास आणि विकसित भारतासाठी जनतेनं मतदान केलं आहे. एवढं मोठं बहुमत इतिहासात कधीच मिळालेल नाही, तेवढं मोठं बहुमत बिहारमध्ये मिळत आहे. संपूर्ण देशावरच बिहारच्या निकालाचे परिणाम होईल. हे काही हवेतले वातावरण नाही. तर जनतेचा आमच्यावर विश्वास आहे. महाराष्ट्रात ५१ज्ञब पेक्षा जास्त मते घेऊन आम्ही निवडणूक जिंकू. तर महायुती दोन तृतीयांश बहुमत घेऊन स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक जिंकेल. असा विश्वास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बोलताना व्यक्त केला आहे.

दरम्यान, काँग्रेस रोजच संपत आहे, राहुल गांधी हतबल झाले आहेत. फक्त मतदार यादीचे चुकीचे मुद्दे समोर करून वेळकाढूपणा करत आहे. विकासाचा कुठलाच अजेंडा त्यांच्याकडे नाही. धर्म, जात पंथाचे राजकारण करणे हेच काँग्रेसचे काम आहे. काँग्रेसच्या बुडत्या जहाजावर बसायला कोणी तयार नाही. काँग्रेसला जनतेने नाकारले आहे. काँग्रेसला बिहारमधून बाहेर काढले आहे. आगामी काळात काँग्रेस इतिहासातील सर्वात छोटा पक्ष होईल. असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

केंद्र सरकार आधीच मजबूत आहे, या निकालाने ऱ्ऊअ आणखी मजबूत होईल. या निकालाने एनडीएची ताकद वाढून एनडीए आणखी घट्ट होणार आहे. निवडणूक नंतर आरोप-प्रत्यारोप होत राहतील. पक्षात शिल्लक असलेले कार्यकर्ते पक्षात राहावे, संकुचित होत असलेली पार्टी वाचावी, यासाठी आता निवडणुकीनंतर आरोप प्रत्यारोप होतील. निकाल येण्यापूर्वीच राहुल गांधी विदेशात निघून गेले आहेत. पुन्हा ईव्हीएम चे खेळ खेळले जातील. मतदार यादी चुकली होती, हे खेळ खेळले जातील. असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

### ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल काळाच्या पडद्याआड, कबीर सिंहमध्ये केली होती प्रसिद्ध भूमिका

**मुंबई/प्रतिनिधी :** दिग्गज अभिनेत्री यांचे वयाच्या ९८ व्या वर्षी निधन झाले. नीचा नगर, जिद्दी आणि लाल सिंग चड्ढा या चित्रपटांसाठी ओळखल्या जाणाऱ्या ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेत्री कामिनी कौशल यांनी आपल्या दीर्घ करिअरमध्ये अनेक अविस्मरणीय भूमिका साकारल्या होत्या. भारतीय चित्रपटातील आपल्या अदा, कौशल्य आणि उत्तम अभिनयाने मोठ्या पडद्यावर आपली प्रतिमा निर्माण केली. त्यांच्या जाण्याने मनोरंजन क्षेत्रात शोककळा पसरली आहे.कामिनी यांच्या परिवाराने त्यांच्या निधनाची पुष्टी केली आहे. सोबतच आवाहन केलं आहे की, त्यांच्या़ा गोपनीयतेचा आदर केला पाहिजे.

कामिनी यांनी आपल्या करिअरची सुरुवात 'नीचा नगर' चित्रपटातून केली होती. तयांना १९४६ च्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये प्रतिष्ठित झरश्राश व'जी पुरस्कार मिळा होता. यानंतर त्यांनी 'शहीद', 'नदिया के पार', 'शबनम', 'आरजू', 'बिरज बहू' यासारखे अनेक यशस्वी चित्रपटांमध्ये काम केलं. त्यांचा अखेरचा चित्रपट २०२२ मध्ये रिलीज झालेला लाल सिंह चड्ढा होता. 'कबीर सिंह'मध्ये शाहिद कपूरच्या आजीची भूमिका देखील त्यांनी साकारली होती. नव्वदीच्या दशकात त्यांनी ९० हून अधिक चित्रपटात काम केलं आहे.


## शब्दकोडे क्र. 09

आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज ४. नीच, पापी, दुष्ट ७. विश्रांती १०. मळलेला ११. उफाड्याचा (बांधा) १३. प्रामाणिक १५. अवास्तव १६. मिठी १७. गावबाहेरची वस्ती १९. तालासुराची गट्टी २०. खाली पडू न देता, नेहमी २१. चेहऱ्यावरील तेज २३. प्रफुल्लित २६. बारा वर्षांचा काळ २८. लहान २९. पाणकोंबडा ३०. दिखाऊ, खोलवर नसलेले ३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ ३५. रहस्य ३७. लोखंड घासण्याचे साधन ३९. फिरणे, चक्कर येणे ४२. अपमान ४३. लक्ष्मीचे एक नाव ४५. युवराज ४६. एकरूप ४८. बडबड ५०. चंद्र ५३. प्रश्न ५५. नवीन आलेला ५७. मृत्यू नसलेला ५८. जंगली ६०. निकट ६१. अनुमती ६३. फणसाचा एक प्रकार ६५. पाप ६८. वितरण ७०. दोन महान ग्रंथ ७२. मगज ७३. उद्याच्या नंतरचा दिवस ७४. कणीदार ७५. मोठी बहीण ७६. विठ्ठलाची पत्नी ७७. नाराजी

उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे २. खंड ३. ताणलेल्या दोरीचा आवाज ४. तानाजीला मिळालेली पदवी ५. हिंमत ६. कपाळभर लावलेले कुंकू ७. कहाणीतील गाव ८. दीर्घ उच्चराने नरम ९. भ्रम १४. नवरदेव १५. इंद्रिय १८. जरा उणीच! २२. वेदना २४. व्रत २५. पूजेचे नक्षीदार ताट २५अ. जहाज लुटणारे २७. खाट, बाज ३०. सिंह, जगलाचा राजा ३१. आवड ३२. रमापती ३४. दरवाजा ३६. सापाची एक जात ३८. नीच, दुष्ट ४०. नामघोष ४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत ४२. अवस ४४. मानी स्त्री ४५. राजाची पत्नी ४६. षष्ठीची देवता ४७. पावसाची धार ४८. देश, जमीन ४९. अरण्य ५१. आगबोट ५२. द्राड, खोडकर ५३. युद्ध ५४. एक सुगंधी वनस्पती ५६. धुसफूस, त्रास ५७. पुष्कळ, खूप ५८. संतापी ५९. समीक्षा ६२. बाजेची कापडी पट्टी ६४. मर्यादा, सीमा ६५. विजार ६६. पंकज ६७. छोटे जाजम ६९. केशरी गराचे स्वस्त फळ ७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे! ७२. मासा पकडण्याचे साधन



### शब्दकोडे क्र. 08 चे उत्तर

आडवे उत्तर

१.रखवालदार ६.मजल दरमजल १२.सर १३.गरजवंत १४.वरण १५.लालन १७.पात १८.लता २०.शतक २२.जबरदस्त २४.माय २५.आभाळ २७.कटाप २८.बाठ २९.मका ३०.पळस ३१.सरसावणे ३३.उदर ३४.रसद ३६.दलदल ३७.दामोदर ३८.रत ४०.पारवा ४१.फार ४३.भारतीय ४५.डरपोक ४८.हत्ती ४९.आवा ५१.कळकळ ५२.नर ५३.अंकगणित ५५.आळस ५६.उद्धव ५८.मारा ५९.डर ६१.सगा ६२.मदन ६५.समोरासमोर ६८.सागर ७०.तवा ७१.जबाबदारी ७२.कालहरण ७४.अदाकार ७५.ताबडतोब ७६.खेटर ७७.गे ७८.पण

उभे उत्तर

१.रसना २.खर ३.लगत ४.दार ५.रजनी ६.मतलब ७.लव ८.दरखास्त १०.जलाशय ११.ललत १६.नकलाकार १७.पातळसर १९.तारा २१.मकरंद २२.जप २३.दर २४.माठ २५.आपपराभव २६.भाळ २८.बाणेदार २९.मदर ३१.सलवार ३२.रद ३३.उदबत्ती ३५.समय ३६.दरड ३९.तर ४२.सांबार ४४.तीरकमान ४६.पोकळ ४७.कळस ४९.आणि ५०.वातड ५२.नवसागर ५४.गरा ५६.उगा ५७.कमतरता ६०.रसदार ६१.सरकारी ६३.दवा ६४.बोंबाबोंब ६६.म ोरी ६७.सरदार ६८.साहस ६९.रणरण ७३.आड ७४.अट

# मेहकर नगर परिषद निवडणूक रंगात!

## चौथ्या दिवशी अध्यक्षपदासाठी ८ तर सदस्यपदासाठी तब्बल ५२ उमेदवारांचे नामांकन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर नगर परिषद निवडणुकीची राजकीय धामधूम चांगलीच वाढली असून, चौथ्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा वेग लक्षणीय वाढला आहे. नगराध्यक्ष पदासाठी आजपर्यंत ८ उमेदवारांनी तर सदस्य पदासाठी तब्बल ५२ उमेदवारांनी नामांकन दाखल केले असून, राजकीय वातावरणात चैतन्य निर्माण झाले आहे.

१० नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या नामांकन प्रक्रियेला १५ नोव्हेंबरपासून आणखी वेग येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे. शहरातील पक्षीय समीकरणे, गाठीभेटी, बैठका व रणनीती ठरविण्याच्या हालचालींना आता वेग आला आहे. १७ नोव्हेंबरपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत असल्याने पुढील दोन दिवसांत उमेदवारांची मोठी गर्दी उमेदवारीसाठी कार्यालयात दाखल होणार आहे.




### सदस्यपदासाठी उमेदवारांची झुंबड सुरूच

१४ नोव्हेंबरपर्यंत ५२ उमेदवारी अर्ज दाखल झाले असले तरी, १५ ते १७ नोव्हेंबरदरम्यान आणखी मोठी गर्दी अपेक्षित आहे. अनेक इच्छुकांतून पक्ष नेतृत्व निवडणुकीत विजयी होण्याच्या दृष्टीने तगडे उमेदवार उभे करण्याच्या विचारात असून, त्यामुळे अनेक प्रभागांमध्ये पूर्वतयारी आणि अंतर्गत स्पर्धेला चांगलाच उधाण आले आहे.

**चौथ्या दिवशी ८ उमेदवार रिंगणात**
**अध्यक्षपदासाठी स्पर्धा रंगणार**

१३ नोव्हेंबर रोजी दोन उमेदवारांनी नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केले होते. १४ नोव्हेंबरपर्यंत ही संख्या वाढत जाऊन एकूण ८ उमेदवारांनी सभागृहातील सर्वोच्च पदासाठी अर्ज दाखल केले आहेत. नगराध्यक्ष पद हे स्थानिक नेतृत्वासाठी प्रतिष्ठेचे असल्याने प्रत्येक पक्ष जिंकण्यासाठी सक्षम व लोकप्रिय उमेदवार उभा करण्याच्या तयारीत आहे.

**सदस्यपदासाठी ५२ नावं**
**पक्षीय तापमान चढले**

मेहकर नगर परिषदेतील सदस्यपदासाठी स्पर्धाही तितकीच अटीतटीची ठरत असून १४ नोव्हेंबरपर्यंत ५२ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले आहेत. पक्षनिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) १० उमेदवार शिवसेना (शिंदे गट) ७ उमेदवार काँग्रेस २२ उमेदवार अपक्ष १३ उमेदवार

या घडामोडीमुळे नगरपरिषद निवडणूक यंदा तिहेरी नव्हे तर बहुकोणी लढत होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

### आजपासून उमेदवारी 'निश्चित' होण्याची शक्यता

नगरपरिषद निवडणूक प्रतिष्ठेची झाल्याने पक्षांमध्ये तीव्र राजकीय गणिते सुरू आहेत. प्रतिस्पर्धी उमेदवारांची ताकद, स्थानिक पातळीवरील जात-समाजबळ, कार्यकर्त्यांची पकड व मतदारांमधील लोकप्रियता पाहूनच नेतृत्व अंतिम उमेदवारी निश्चित करणार आहे.

नगराध्यक्ष पदासाठी प्रतिस्पर्धी पक्ष कोणता उमेदवार उभा करतो यावर अनेक पक्षांची रणनीती अवलंबून आहे. त्यामुळे आज आणि उद्याचे दोन दिवस राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

मेहकर नगर परिषदेची निवडणूक यंदा चुरशीची होणार हे निश्चित असून, नगराध्यक्षपदासह सदस्यपदाची लढत राजकीयदृष्ट्या रंगतदार आणि निर्णायक ठरणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## बुलढाणा सायबर पोलीसांची मोठी कामगिरी, 'डिजिटल अरेस्ट' फसवणूक प्रकरणातील १० लाखांपैकी ९.९४ लाख रुपये परत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सायबर गुन्ह्यातील अत्यंत गंभीर समजल्या जाणाऱ्या "डिजीटल अरेस्ट" स्वरूपातील फसवणूक प्रकरणात बुलडाणा सायबर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने मोठी कामगिरी बजावली आहे. तक्रारदार विनोदकुमार उत्तमराव साळोक आणि त्यांची पत्नी यांना खोट्या सीबीआय व ट्राई विभागाच्या नावाने धमकी देत त्यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे खोटे आरोप लावून १० लाख रुपये ऑनलाईन भरावयास लावून फसवणूक करण्यात आली होती..या प्रकरणात पोलिसांनी तातडीने कारवाई करीत फिर्यादीची तब्बल ९.९४ लाख रुपये परत मिळवून दिले आहेत..तर आरोपी विरूद्ध सायबर पोलीस स्टेशन विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे..ही कामगिरी पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रकाश सदगर, तपास अधिकारी पो. नि. संग्राम पाटील यांच्या पथकाने केली.. तर यावेळी "डिजीटल अरेस्ट" असा स्वरुपाचा कोणताही प्रकार नसतो. पोलीस किंवा कोणतेही डिपार्टमेंट व्हॉट्सअॅपव्दारे कॉल किंवा व्हिडीओ कॉल करुन आपणास अटक करत नाही. त्यामुळे अनोळखी नंबरवरुन येणारे व्हॉट्सअॅप कॉल किंवा व्हिडीओ कॉल आल्यास नागरिकांनी त्यास प्रतिसाद देवू नये. तसेच ऑनलाईन आर्थिक फसवणुक झाल्यास तात्काळ राष्ट्रीय सायबर क्राईम हेल्पलाइन क्रमांक १९३० किंवा १९४५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक नीलेश तांबे यांनी केले आहे.



## नागरे महाविद्यालयाने इयत्ता बारावीच्या बोर्ड परीक्षा भयमुक्त व कॉपीमुक्त कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** नारायणराव नागरे महाविद्यालया मध्ये १० फेब्रुवारी २०२६ मध्ये उच्च माध्यमिक इयत्ता बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा कॉफी मुक्त व भयमुक्त घेण्याचे शासनाचे धोरण असल्याने महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांकरिता व पालकांकरिताकार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रशांत गावंडे हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षांचे महत्व आणि त्याबाबत संबंधित गोष्टी समजून सांगितल्या तसेच परीक्षेमध्ये कॉपीमुक्त अभियान राबवण्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांना प्रेरित केले त्याचप्रमाणे परीक्षेमध्ये आवश्यक त्या गोष्टींची काळजी कशा पद्धतीने घ्यावी याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषण संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे आधीसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. विजय नागरे विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त व भयमुक्त परीक्षा अभियान राबवून ग्रामीण भागातील गुणवत्ता वाढीसाठी कशा पद्धतीने प्रयत्न करता येईल त्याविषयी चर्चा केली व पालकांनी सुद्धा कॉफी मुक्त व भयमुक्त परीक्षा साठी शिक्षक प्राचार्य आणि संस्थेचे पदाधिकारी यांना सहकार्य करावे आणि विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली यावर्षी शासनाकडून परीक्षा ह्या सीसीटीव्ही कॅमेरे तसेच ड्रोन व बैठे पथकांच्या माध्यमातून घेण्यात येईल व परीक्षा पेपर संपल्यानंतर रेकॉर्डिंग तपासण्यातील त्यामध्ये जर काही परीक्षार्थींनी गैरप्रकारचा अवलंब केल्यास किंवा त्या ठिकाणी शिक्षक व इतर कोणी गैरप्रकार करताना आढळून आल्यास त्यावरती फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे सूचना महाविद्यालयाला देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्राध्यापक मिलिंद गवई यांनी केले कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले सहकार्यक्रमाधिकारी प्रा. कु.नयना गवारे प्रा. शेख युनूस प्रा. मेहेर प्रा. राम पोखरकर प्रा. सत्यम श्रीवास्तव श्री अनिल रणमळे श्री गजानन मुंढे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### नवले पुलावर का होताहेत वारंवार अपघात?

**पुणे/प्रतिनिधी:** मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर होणारे गंभीर अपघात रोखण्यासाठी नवीन कात्रज बोगदा ते नवले पूल दरम्यान असलेल्या सात किलोमीटरच्या अंतरात अवजड वाहनांची वेगमर्यादा प्रतितास ६० किलोमीटर वरून ४० किलोमीटर एवढी करण्यात आली आहे. वेगमर्यादा निश्चित केल्यानंतर अवजड वाहन चालकांकडून सर्रास नियम धुडकाविण्यात येत असल्याचे दिसून आले आहे.

नवले पुलावर गुरुवारी (१३ नोव्हेंबर) साताऱ्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. या कंटेनरने १० ते १२ वाहनांना धडक दिल्यामुळे लागलेल्या आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला. अपघातात नऊ ते दहा जण गंभीररित्या जखमी झाले. मुंबई-बंगळुरु बाह्यवळण मागार्वर नवले पूल परिसरात घडलेल्या गंभीर स्वरूपाचे अपघात यापूर्वी घडले आहेत.

## मेहकरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची विस्तारित जंबो कार्यकारिणी जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची मोठ्या उत्साहात विस्तारित जंबो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. मेहकरलोणार मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपस्थितीत आज जनसंवाद कार्यालयात झालेल्या भव्य कार्यक्रमात ही नवीन कार्यकारिणी घोषित झाली.

कार्यक्रमास उपजिल्हा प्रमुख प्रा. आशिष रहाटे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, युवा सेना तालुका अधिकारी अॅड. आकाश घोडे, मेहकर शहर प्रमुख किशोर गारोळे, तसेच महिला आघाडी लोणार तालुका अध्यक्षा तारामती जायभाये यांची मुख्य उपस्थिती लाभली.

नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन व मशाल चिन्ह असलेले रुमाल गळ्यात घालून त्यांचे पक्षात जोरदार स्वागत करण्यात आले.

आमदार सिद्धार्थ खरात यांनी सर्व नव्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकांसाठी एकजुटीने मैदानात उतरून पक्षाला भक्कम बहुमत मिळवून देण्याचे आवाहन केले.

**नवीन नियुक्त पदाधिकारी**
**मेहकर तालुका**
**लोणी गवळी शाखा**

शाखा प्रमुख प्रमोद जागृत
युवा सेना प्रमुख शरद पाटील
उपशाखा प्रमुख एकनाथ इंगळे
युवा उपशाखा प्रमुख गौतम वानखेडे

**नागापूरशिरपूर शाखा**

शाखा प्रमुख धनंजय खिल्लारी

**वरूडशिरपूर शाखा**

शाखा प्रमुख तेजराव अवसरमोल
उपशाखा प्रमुख भरत शिंदे

**देऊळगाव साकर्शा शाखा**

शाखा प्रमुख डीगांबर आल्हाट
उपशाखा प्रमुख शेख गुलाब शेख यासीन
युवा सेना प्रमुख नरेश साठे

**आंध्रुड शाखा**

शाखा प्रमुख तेजराव देशमुख
उपशाखा प्रमुख आतिश जाधव
युवा सेना प्रमुख उमेश वैद्य
उपशाखा प्रमुख शेषराव पवार

**अंजनी शाखा**

शाखा प्रमुख गजानन वसनकर
उपशाखा प्रमुख भागवत पुंड

मेहकर तालुक्यात पक्ष संघटनेची पकड मजबूत करण्यासाठी जाहीर झालेली ही विस्तारित कार्यकारिणी आगामी निवडणुकांत निर्णायक ठरणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.



## वृत्तविशेष...

### कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विकासासाठी आम्ही एकत्रित आलो - संचालक अशोक हटकर





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे दिलीप सानंदा यांचे गटाचे सभापती सुभाष पेसोडे यांच्यावर आलेला अविश्वास प्रस्ताव आज बहुमताने पारित करण्यात आला आहे आज या बाबत ठराव पारित करण्यात आला या मध्ये १८ पैकी १३ सदस्य उपस्थित तेरापैकी १२ सदस्यांनी अविश्वास प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले. स्थानिक टीएमसी मार्केट यार्ड येथे सभा पार पडली. खामगावचे कॅबिनेट मंत्री आकाश फुंडकर यांनी राष्ट्रवादी चे सानंदा यांना दिलेला हा फार मोठा झटका मानल्या जात आहे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीचे निमित्ताने खामगाव येथे महायुती मध्ये मोठा संघर्ष निर्माण झाला. बाजार समितीच्या विकास कामांसाठी व शेतकऱ्यांच्या सेवेसाठी आम्ही संचालक मंडळ हे एकत्रित येऊन आम्ही हा ठराव घेतलेला आहे.

### निवडणूक निर्णय अधिकारी व ठाणेदार कडून मतमोजणी व स्ट्राँग कक्ष ची पहाणी




दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी/प्रतिनिधी:** ढाणकी मध्ये होऊ घातलेल्या नगरपंचायतच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमरखेड तहसीलदार राजेश सुरडकर यांच्यावर निवडणूक निर्णय अधिकारीची जबाबदारी असून निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, या ची सुरक्षा आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी कडक उपाययोजना करण्यासाठी ढाणकी येथील शासकीय अन्न धान्य गोडाऊन येथे होणाऱ्या मतदानची मोजणी केंद्रांची व स्ट्राँग रूमची शुक्रवारी पाहणी केली. या पाहणीदरम्यान निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यात आला. यावेळी बिटरगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार पांडुरंग शिंदे, रवी गिते निगनूर बिट जमादार, राहुल कोकरे पोलीस शिपाई, व प्रकाश मुंडे पोलीस शिपाई उपस्थित होते.

### वाशिम जिल्ह्यात अखेर महाविकास आघाडीचा एकत्र लढण्याचा निर्णय. तीनही पक्षाची बैठक संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी:** वाशिम जिल्ह्यात चार नगरपरिषद आणि एका नगर पंचायतीच्या निवडणुकीसाठी आज महाविकास आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली असून निवडणुक एकत्र लढण्याचा निर्णय घेण्यात आलाय. या बैठकीला उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय देशमुख, काँग्रेसचे आमदार आणि जिल्हाध्यक्ष अमित झनक तसेच शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबाराव खडसे यांची उपस्थिती होती.

या बैठकीत जिल्ह्यातील सर्व नगर परिषद निवडणुका एकत्र लढण्याचा महाविकास आघाडीने निर्णय घेतला आहे. पुढील दोनतीन दिवसांत जागावाटपाची प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती देण्यात आली.दरम्यान, वंचित बहुजन आघाडीने वाशिम आणि मंगरूळपीर येथील उमेदवारी अद्याप जाहीर केलेली नाही. ते महाविकास आघाडीसोबत राहिले तर आवश्यक तेवढ्या जागा सोडण्याबाबत विचार केला जाईल, असे खासदार संजय देशमुख यांनी सांगितले.